जनेप प्राधिकरण JNPA
INDIA'S LARGEST CONTAINER PORT
CONNECTED. COMMITED. TRUSTED

# JNPA Observes International Day of Yoga 2026 with theme "Yoga for Healthy Ageing"

**Mumbai, June 21, 2026:** Jawaharlal Nehru Port Authority (JNPA) - India's largest container port, celebrated the International Day of Yoga 2026 with great enthusiasm at its premises, in pursuance of the directions issued by the Ministry of AYUSH and the communication received from the Ministry of Ports, Shipping and Waterways. The celebration was organized around this year's global theme, "Yoga for Healthy Ageing."

As part of the celebrations, JNPA organized a Guided Yoga Session led by an expert Yoga instructor, followed by a Deep Meditation Session conducted by representatives of Brahma Kumaris. The sessions witnessed active participation from Shri Gaurav Dayal, IAS, Chairperson, JNPA; Shri Ravish Kumar Singh, IRTS, Deputy Chairperson, JNPA; CISF Commandant; CISF personnel; officers and employees of JNPA, who collectively embraced the spirit of wellness and mindfulness.

On the occasion, **Shri Gaurav Dayal, IAS, Chairperson, JNPA**, said, *"The International Day of Yoga provides a unique opportunity for all of us to pause, reconnect with ourselves, and embrace practices that contribute to long-term health, happiness, and well-being. Yoga is a valuable gift of India's ancient wisdom that continues to guide people across the world towards a balanced and healthy lifestyle. Yoga is a way of healthy life. We as one JNPA family celebrate this occasion with enthusiasm, commitment, and a shared resolve to adopt healthier lifestyles."*

To further amplify the message of wellness and encourage wider public participation, JNPA also conducted a dedicated **Yoga Day social media campaign** across its digital platforms, promoting the significance of Yoga and this year's theme, "Yoga for Healthy Ageing."

Through such initiatives, JNPA continues to foster a culture of physical fitness, mental well-being and work-life balance among its employees while contributing to the larger national movement of promoting Yoga as a way of life.

**About Jawaharlal Nehru Port Authority (JNPA):**

The Jawaharlal Nehru Port Authority (JNPA) is one of the premier container-handling ports in India. Since its inception on May 26, 1989, JNPA has transformed from a bulk cargo terminal into the premier container port in the country.

Currently, JNPA operates five container terminals - NSFT, NSICT, NSIGT, BMCT and APMT. The Port also has a shallow water berth for general cargo operated by Nhava Sheva Distribution Terminal Pvt. Ltd. (NSDT). A Liquid Cargo Terminal present at the JNPA Port is managed by the BPCL-IOCL consortium and the additional liquid cargo terminal developed by JNPA is operated by M/s JSW - JNPT Liquid Terminal Pvt. Ltd. Additionally, the newly constructed coastal berth links other Indian ports and facilitates enhancing the traffic of coastal containers. Nestled across 277 hectares of land, JNPA also operates a meticulously designed multi-product SEZ, with state-of-the-art infrastructure, to boost export-oriented industries in India.

JNPA is also developing an all-weather, deep-draft, greenfield port at Vadhvan, the 13th Major Port of India in Maharashtra. It is poised to be among the top 10 ports globally and will be a 100% green port since its inception.

**For media enquiries, please contact:**

Ambika Singh

Sr. Manager (Marketing), JNPA

Mob: +91 9920372677

E-mail: ambikasingh@jnport.gov.in

**Visit our website and social media to learn more:**

JN Port: www.jnport.gov.in

LinkedIn: JNPA- Jawaharlal Nehru Port Authority

X: @JNPort

Instagram: @jnpaport

Facebook: @JNPA

— Ends —

# 'योग फॉर हेल्दी एजिंग' या संकल्पनेअंतर्गत जेएनपीएत आंतरराष्ट्रीय योग दिन २०२६ उत्साहात साजरा

**मुंबई, 21 जून 2026:** भारतातील सर्वात मोठे कंटेनर बंदर असलेल्या जवाहरलाल नेहरू पोर्ट प्राधिकरणाने (जेएनपीए) केंद्रीय आयुष मंत्रालयाच्या निर्देशांनुसार तसेच केंद्रीय बंदरे, जलवाहतूक आणि जलमार्ग मंत्रालयाकडून प्राप्त झालेल्या सूचनांच्या अनुषंगाने, आपल्या परिसरात आंतरराष्ट्रीय योग दिन २०२६ उत्साहात साजरा केला. यंदाच्या आंतरराष्ट्रीय योग दिनाची "योग फॉर हेल्दी एजिंग" (निरोगी वार्धक्यासाठी योग) ही जागतिक संकल्पना केंद्रस्थानी ठेवून या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

योग दिनानिमित्त जेएनपीएत तज्ज्ञ योग प्रशिक्षकांच्या मार्गदर्शनाखाली विशेष योग सत्राचे आयोजन करण्यात आले. त्यानंतर ब्रह्माकुमारी संस्थेच्या प्रतिनिधींनी सखोल ध्यान (डीप मेडिटेशन) सत्र घेतले. या कार्यक्रमात जेएनपीएचे अध्यक्ष श्री गौरव दयाल, भा. प्र. से., उपाध्यक्ष श्री रवीश कुमार सिंह, भा. रे. वा. से., सीआयएसएफचे कमांडंट, सीआयएसएफ जवान तसेच जेएनपीएचे अधिकारी आणि कर्मचारी यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवत निरोगीपणा, मानसिक स्वास्थ्य आणि सजगतेचा संदेश आत्मसात केला.

यावेळी बोलताना **जेएनपीएचे अध्यक्ष श्री गौरव दयाल, भा. प्र. से. म्हणाले,** *"आंतरराष्ट्रीय योग दिन आपल्याला दैनंदिन धावपळीतून काही क्षण स्वतःसाठी काढण्याची, आत्मपरीक्षण करण्याची आणि दीर्घकालीन आरोग्य, आनंद व सर्वांगीण कल्याणाला चालना देणाऱ्या सवयी अंगीकारण्याची संधी देतो. योग ही भारताच्या प्राचीन ज्ञानपरंपरेची अमूल्य देणगी असून, आजही तो जगभरातील लोकांना संतुलित, निरोगी आणि सकारात्मक जीवनशैलीचा मार्ग दाखवत आहे. योग ही केवळ एक साधना नसून निरोगी जीवन जगण्याची एक जीवनपद्धती आहे. जेएनपीए कुटुंब म्हणून आम्ही हा दिवस उत्साहाने आणि अधिक आरोग्यदायी जीवनशैली स्वीकारण्याच्या सामूहिक संकल्पासह साजरा करत आहोत."*

निरोगी जीवनशैलीचा संदेश अधिक व्यापक स्तरावर पोहोचविण्यासाठी आणि जनसामान्यांचा सहभाग वाढविण्यासाठी जेएनपीएने आपल्या विविध डिजिटल माध्यमांवर विशेष योग दिन सोशल मीडिया मोहिमही राबविली. या मोहिमेद्वारे योगाचे महत्त्व तसेच यंदाची "योग फॉर हेल्दी एजिंग" (निरोगी वार्धक्यासाठी योग) ही संकल्पना प्रभावीपणे जनतेपर्यंत पोहोचविण्यात आली.

अशा उपक्रमांच्या माध्यमातून जेएनपीए आपल्या कर्मचारीवर्गामध्ये शारीरिक तंदुरुस्ती, मानसिक स्वास्थ्य आणि काम-जीवन समतोलाची संस्कृती रुजविण्यास सातत्याने प्रोत्साहन देत आहे. तसेच, योगाला जीवनशैलीचा अविभाज्य भाग म्हणून स्वीकारण्याच्या राष्ट्रीय जनआंदोलनाला बळकटी देण्यातही जेएनपीए सक्रिय योगदान देत आहे.

जनेप प्राधिकरण
JNPA
INDIA'S LARGEST CONTAINER PORT
CONNECTED. COMMITED. TRUSTED

**जवाहरलाल नेहरू पोर्ट प्राधिकरण (जेएनपीए) विषयी माहिती:**

जवाहरलाल नेहरू पोर्ट प्राधिकरण (जनेप प्राधिकरण) हे भारतातील प्रमुख कंटेनर हाताळणी बंदरांपैकी एक आहे. 26 मे 1989 रोजी स्थापना झाल्यापासून, जनेप प्राधिकरण एक बल्क कार्गो टर्मिनलवरून देशातील प्रमुख कंटेनर बंदरात रूपांतरित झाले आहे.

सध्या, जनेप प्राधिकरण पाच कंटेनर टर्मिनल्स चालवते एन एस एफ टी, एन एस आय सी टी, एन एस आय जी टी, बी एम सी टी आणि ए पी एम टी. न्हावा शेवा डिस्ट्रिब्युशन टर्मिनल प्रा. लि. (एनएसडीटी) द्वारे संचालित सामान्य मालासाठी एक उथळ पाण्याचा बर्थ देखील आहे. जनेप प्राधिकरण पोर्टवर उपस्थित असलेले लिक्विड कार्गो टर्मिनल बीपीसीएल आयओसीएल कन्सोर्टियम द्वारे व्यवस्थापित केले जाते आणि जेएनपीएने विकसित केलेले अतिरिक्त लिक्विड कार्गो टर्मिनल मेसर्स जेएसडब्ल्यू - जेएनपीटी लिक्विड टर्मिनल प्रा. लि. द्वारे चालवले जाते. या व्यतिरिक्त, नव्याने बांधलेला किनारी धक्का इतर भारतीय बंदरांना जोडतो आणि किनारपट्टीवरील कंटेनरची वाहतूक वाढवते.

277 हेक्टर जमिनीवर वसलेले, जनेप प्राधिकरण भारतातील निर्यात-केंद्रित उद्योगांना चालना देण्यासाठी, अत्याधुनिक पायाभूत सुविधांसह, काळजी पूर्वक डिझाइन केलेले बहुउत्पादक विशेष आर्थिक क्षेत्र (SEZ) देखील चालवते.

जेएनपीए वाढवण येथे एक सर्व-हवामान, डीप ड्राफ्ट, ग्रीनफिल्ड बंदर विकसित करत आहे, जे महाराष्ट्रातील भारताचे १३वे मोठे बंदर असेल. हे जागतिक स्तरावरील सर्वोत्कृष्ठ १० बंदरांमध्ये स्थान मिळवणार आहे आणि स्थापनेपासून १००% हरित बंदर असेल.

**मीडिया चौकशीसाठी, कृपया संपर्क साधा:**

**जनेप प्राधिकरण:**

अंबिका सिंग

सीनियर मॅनेजर (मार्केटिंग), जनेप प्राधिकरण

मोबाईल क्रमांक: +919920372677

ईमेल: ambikasingh@jnport.gov.in

**अधिक माहितीसाठी आमच्या वेबसाइट आणि सोशल मीडियाला भेट द्या:**

जेएन पोर्ट : www.jnport.gov.in

लिंक्डइन: JNPA- Jawaharlal Nehru Port Authority

एक्स: @JNPort

इंस्टाग्राम: @jnpaport

फेसबुक: @JNPA